# तो आणि ती

- मयुरेश कुलकर्णी



तो थकून घरी येतो ,
ती थकून घरी येते
तो कॉफी करतो ,
ती गाणी लावते
दोघे शांत बसून कॉफी पितात

मौनाच्या भाषेतून ह्रुदयांशी बोलायचं
हेच तर प्रेम असतं




तो तिच्याकडे बघतो
ती त्याच्याकडे बघते
तिचं हास्य प्रश्न विचारतं
त्याचे डोळे उत्तर देतात
त्या हास्यातले प्रश्न आणि त्यांची उत्तरं
हेच तर प्रेम असतं

तो एकटा चालतो
ती एकटी चालते
मग दोघे भेटतात
हातात हात घालून चालतात

काही पावलं एकटं चालून पुन्हा एकत्र येणं
हेच तर खरं प्रेम असतं




तो पंखा बंद करतो
ती पंखा सुरु करते
तो परत पंखा बंद करतो
ती, तो झोपल्यावर, पंखा परत सुरु करते...
कधी त्याचं खरं तर कधी तिचं खरं
हेच तर प्रेम असतं

तो कॉफी हवी आहे का विचारतो
ती गोड हसून नको म्हणते
त्याने कॉफी केल्यावर, त्याच्या कपातून पिते
त्यालाही हा प्रकार कळलेला असतो
म्हणून त्याने आधीच जास्त कॉफी केली असते...

पण, कॉफी त्याच्या कपातून गोड लागते
म्हणून न मागता पिणं... हेच तर प्रेम असतं




ती ऑफिसातून घरी उशीरा येते
तो स्वयंपाक करून ठेवतो
तो जेवण कसं झालय विचारतो
ती छान झालय म्हणते...


त्याच्या खारट भाजीतही त्याचा गोडवा शोधणं
हेच तर प्रेम असतं





तो श्रीमंत नाही
ती पण श्रीमंत नाही
दोघे कट्ट्यावर बसतात, कॉफी मागवतात
भरपूर गप्पा मारतात...

बाहेरच्या थंडीत, गप्पांच्या गर्मीत
दोन कप कॉफी दोन तास टिकवणं
हेच तर प्रेम असतं



तो अग्नी झाला की
ती पाणी होते
ती आरडाओरडा करायला लागली
की तो समजून घेतो, समजूत घालतो...
कधी ताणून धरायचं आणि
कधी सोडून द्यायचं हे कळणं
हेच तर प्रेम असतं


1ST BY VCHEMICAL
मित्रात असताना
तो काहीतरी बोलतो
ती हळूच हसते
मग दोघे हसायला लागतात
मित्रांना काहीच कळत नाही
हे वेड ज्यांना लागलं त्यांनाच हे कळतं
हेच तर प्रेम असतं



ती त्याला भेटली नसते
तो तिला भेटला नसतो
ती त्याची स्वप्ने बघते
तो ही तिची स्वप्ने बघतो
कल्पनांतच नेहमी मजा असते
वास्तविकता नेहमी निराश करते
हेच कदाचित प्रेम असतं


तिला रात्री सिनेमा बघायचा असतो
त्याला सकाळी लवकर जाग येत असते
तो रात्री जागून सिनेमा बघतो
सकाळी लवकर जाग येते
तो तिच्यासाठी नाश्ता बनवतो
“ तिच्या हास्यापेक्षा झोप महत्वाची नसते”
स्वतःची थोडीशी गैरसोय करुन, दुस-याला खुश करायचं
हेच तर प्रेम असतं




तिला झोप येत असते
त्याची उद्या परीक्षा असते
ती रात्रभर त्याला सोबत म्हणून
कादंब-या वाचत जागी राहते


ही अशी वेडं जे लावतं
तेच तर प्रेम असतं



तो पुढे-पुढे ती पाठी-पाठी
त्याच्या तोंडात कवळी
अन तिच्या हातात काठी
हातात हात घेऊन आजी आजोबा
ऊसाचा रस प्यायला जातात
आपल्या म्हाता-या पावलांनी
तरूण प्रेमींनापण पाठी टाकतात...
प्रेमाच्या झाडाला वर्षानुवर्षं
पाणी घालायचं असतं , हेच तर..



तिला माणसांचं वेड
त्याला एकटं राहायचा छंद
ती सगळ्यांशी गप्पा मारते
त्याचं तोंड सदैव बंद
पण एकत्र ते दोघे मजेत असतात,
तिथे ही दोन टोके बरोबर जुळतात
काय माहिती यांचं इतकं कसं जमतं
हेच कदाचित प्रेम असतं


तो काही रांझा नाही
आणि ती पण हीर नाही
ती कुठली राणी नाही
आणि तो शूरवीर नाही
पण ती त्याच्या जीवनाची नायिका आहे
आणि तो तिच्या जीवनाचा नायक...
आणि या दोघांची ही साधी सोपी कहाणी
हेच कदाचित प्रेम असतं





तो प्रेमावर कविता करत नाही
तिलाही शायरी वगैरे जमत नाही
तो प्रेम करतो हे सांगावं लागत नाही
तिला प्रेम दर्शवायला शब्द लागत नाही...
दोघांच्या नजरा भेटल्या की
पापण्यातून जे डोकावतं
तेच कदाचित प्रेम असतं


Одиночество
तिला थंडी वाजते
त्याच्याकडे स्वेटर असतो
तो स्वेटर तिला देतो
आता तो कुडकुडत असतो
ती जाऊन त्याला मिठी मारते
अशी ऊर्जा मिळणार असली
तर कुडकुडण्यात मजा येते
हेच तर प्रेम असतं


तो सारखा तिच्या पुढे मागे नाही
आणि ती सारखी त्याच्या सोबत नाही
तो त्याच्या वाटेवर तिच्यासाठी थांबतो
ती तिच्या रस्त्यावर त्याची वाट बघते
जबरदस्तीने बांधणं प्रेम नाही
जे बंधन स्वतंत्र करतं
तेच खरं प्रेम असतं
daniel3d


तो शस्त्र खाली ठेवतो
ती पण पराजय स्वीकारते
तो तिला त्याचा अभिमान देतो
ती त्याला तिचा अहंकार देते
जे नाही मिळालं तर मागावसं वाटतं
आणि जे न मागता सगळं मिळवतं
ज्या लढाईत शरण गेल्यावर
विजय आपोआप मिळतो
तेच खरं प्रेम असतं...


माझ्याकडे शब्द आहेत, ओळी आहेत
तिच्याकडे तो आणि त्याच्याकडे ती आहे
त्यांना शब्दांची काय गरज
ज्यांचे डोळे बोलके आहेत
त्यांना प्रेक्षकांची काय आवश्यकता
ज्यांची जीवनं त्यांच्या स्वप्नासारखी
आहेत...
मी ज्या प्रेमाची व्याख्या शोधतो
हे दोघे ते प्रेम जगतात
माझे शब्द जिथे संपतात
यांची जीवने सुरु होतात
तेच खरं प्रेम असतं...

प्रकाशक आणि वितरक

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com (9869674820)



# सजावट आणि मांडणी

Last Bench Designs



कवी - मयुरेश कुलकर्णी
( विद्यार्थी )
वास्तव्य – दक्षिण आफ्रिका
mayuresh87@gmail.com



